# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर
## P.R.O. Office, Palghar
Phone No. 02525-297032, Mob No.8669604078
Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)
E-mail : propalghar@gmail.com

## प्रेसनोट दि.३०/०६/२०१८

दिनांक २७/०६/२०१८ रोजी सायंकाळी ०६.०० वा.चे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील भोयदापाडा परीसरातील डोंगरावर असलेल्या खंडयामध्ये साचलेल्या पाण्यामध्ये यातील मयत नामे रोहीत लालचंद चौधरी वय २४ वर्षे रा.भोयदापाडा यांचे प्रेत त्यांचे गळयावर व चेह-यावर वार करुन जीवे ठार मारलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने मयत यांचे वडील लालचंद रामसुरत चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वालीव पोलीस ठाणे गु.रजि.क्र.I ५६५/२०१८ भादविस कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा अज्ञात आरोपी विरुध्द दाखल करण्यात आला होता.

मा.वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली गुन्हयातील अज्ञात आरीपीचा शेध घेणेकामी ०२ स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. आरोपीचा काही मागमुस नसताना तांत्रीक व परिस्थीतीजन्य प्राप्त पुराव्याचे आधारे मयत हा त्याचे घरातील लोकांना नाहक त्रास देत होता. म्हणुन मयताचे जवळच्या नातेवाईकांनीच कट रचुन सुपारी देवुन मयताचा खुन केल्याचे तपासात निष्पन्न केले. तसेच आपल्यावर संशय येवु नये म्हणुन यातील मयत याची आई हीने प्रथम दि.२६.०६.२०१८ रोजी मुलगा मिसिंग झाल्याची खबर पोलीस ठाण्यात देवुन पोलीसांची दिशाभुल केल्याचे व त्यानंतर दि.२७.०६.२०१८ रोजी मयताचे प्रेम सापडल्यानंतर मयताचे वडीलांनी आपल्या मुलास कोणीतरू अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन जीवे ठार मारल्याची खोटी फिर्याद दिल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

सदर गुन्हयाचा पोलीसांनी अत्यंत कौशल्यपुर्ण तपास करुन आरोपी निष्पन्न करुन ०२ पुरुष व ०२ महिला आरोपी यांना २४ तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आणला असुन गुन्हयातील इतर साथीदारांचा शोध सुरु आहे.

सदर कारवाई मा.श्री.मंजुनाथ सिंगे पोलीस अधिक्षक पालघर, मा.श्री.राजतिलक रौशन अपर पोलीस अधीक्षक वसई, मा.श्री.दत्ता तोटेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी वसई, श्री. भरत जाधव वपोनिरी वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुधीर धायरकर, सपोनि चौधर, सपोनि पाटील , पोउनिरी चव्हाण, पोउपनिरी विनायक माने, पोना/११०६ महेश जाधव, पोना/सोनावणे, पोशि/१६६२ शैलेश गावित, पोशि/१०७७ फड, पोशि/१४७ बलिद, पोशि/व्हसकोटी यांनी गुन्हयाचा तपास कुशलतेने करुन मयताची ओळख पटविल्यानंतर २४ तासाचे आत आरोपीत निष्पन्न करुन त्यांना अटक करण्यात महत्त्वाची भुमिका बजावली आहे. गुन्हयाचा अधिक तपास वालीव पोलीस ठाणे येथे करित आहेत.